



# समर्थमय टाकळी

**समर्थ रामदासांच्या 'भीमरूपी महारुद्रा वज्र हनुमान मारुती', या स्तोत्राने व 'जय जय रघुवीर समर्थ' या गर्जनेने महाराष्ट्रावर आलेली मरगळ झटकली, तर 'सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची' या गणपती आरतीने जगभरातील गणेशभक्तांच्या मनात समर्थांनी स्थान मिळवले. 'मनाचे श्लोक' आणि 'दासबोध' या समर्थ रचनांनी मानवी जीवनचक्राला शिस्त लावली. समर्थांच्या कठोर तपश्चर्येमुळे सर्वज्ञात झालेल्या टाकळीत अजूनही समर्थ रामदासांच्या अस्तित्वाच्या खुणा आढळतात. ही समर्थांची तपोभूमी असल्याची प्रचिती पावलोपावली येते.**

■ रमेश पडवळ

तपोवनातून टाकळीत जाताना आपण एखाद्या नव्या शहरात प्रवेश करीत आहोत, असा भास व्हावा, इतका शहरी स्पर्श टाकळी अंगी बाणवू लागली आहे. मात्र तिची मूळ ओळख कायम आहे, ती म्हणजे समर्थांची टाकळी! समर्थ इ. स. १६२१ ते १६३३ असे १२ वर्षे टाकळी गावात राहिले होते. येथेच त्यांनी तपश्चर्या व कठोर साधना केली. नंदिनी व गोदावरीच्या संगमात उभे राहून 'श्रीराम जयराम जयजय राम' या मंत्राचा तेरा कोटी जप, दररोज १२०० सूर्यनमस्कार करून त्यांनी मानसिक आणि शारीरिक शक्तीचा विकास केला. म्हणूनच टाकळी बलोपसनेचे केंद्र म्हणून ओळखले जाते. टाकळीच्या हवेत विकासाचे वारे वाहत असल्याचा अनुभव मनाला स्पर्श करतो.

१६०६साली रामनवमीच्या दिवशी जालना जिल्ह्यातील जांब या गावी समर्थ रामदासांचा (नारायण ठोसर) जन्म झाला. तरुणाईकडे झेपावत असलेले नारायण मध्यम उंचीचे. मजबूत बांधा, गौरवर्ण, तेजस्वी नजर, कपाळावर लहानसे टेंगुळ असे त्यांचे रूपरंग होते. लग्नासाठी बोहल्यावर उभे राहिल्यावर भटजीच्या तोंडून 'सावधान' हा शब्द ऐकताच ते बोहल्यावरून पळाले; ते थेट नाशिकमध्ये आले. बहुतेक संतांना मानवी गुरू आहेत. मात्र समर्थांना मानवी गुरू नाहीत. स्वतः श्रीरामाने त्यांना राममंत्राचा अनुग्रह दिल्याची आख्यायिका आहे. श्रीराम वनवासासाठी नाशिकला का आले असावेत, असा प्रश्न कधीतरी समर्थांना पडला असेल म्हणून या शोधात ते नाशिकला आले असतील. नाशिकच्या सौंदर्याची भुरळ समर्थांना पडल्याने त्यांनी येथेच उपासना करण्याचे ठरवले, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

*समर्थ रामदास स्वामी लिहितात-*

*जनस्थान गोदातिरी। परमपावन पंचवटी,*
*जेथे पडली कृपादृष्टी। रघोत्तमा*
*रामाची।।*
*तेथील राम उपासक। त्यांच्या सेवकाचा*
*सेवक,*
*तुम्हांमध्ये मी येक रंक। सरते करावे।।*

समर्थांनी व्यक्त केलेल्या मताचा साक्षात्कार टाकळी येथील समर्थांनी स्थापन केलेला पहिला मठ पाहिल्यावर होतो. रामदास स्वामींना आपला पहिला शिष्य उद्धव टाकळी येथील मठात भेटल्याचे म्हटले जाते. याबाबत अशी आख्यायिका आहे की, टाकळी येथील साधना काळातच रामदासांनी कुलकर्णी नावाच्या व्यक्तीला पुनर्जिवित केले. म्हणून या कुलकर्णींनी आपला पहिला पुत्र रामदास स्वामींना अर्पण केला. तोच त्यांचा पहिला शिष्य उद्धवस्वामी होय. समर्थांचा शिष्य संप्रदाय पुढे महाराष्ट्रात सर्वत्र पसरला. त्यांच्या प्रमुख शिष्यांत कल्याणस्वामी, वेणास्वामी, अक्काबाई, भीमस्वामी, दयानंदप्रभू, दिवाकर स्वामी यांचाही समावेश होतो. त्यामुळेच समर्थांच्या टाकळीतील मठाला रामदासी संप्रदायात फार महत्त्व आहे, अशी माहिती सुधीर शिरवाडकर यांनी दिली.





समर्थांना लोकस्थितीचे उत्तम ज्ञान होतं, अनेक भाषा अवगत होत्या. मराठी, संस्कृत, हिंदी व उर्दू यांवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांच्या मठाधिपतींच्या नियमित गुप्त बैठकी होत असत. अशा बैठकांसाठी ठिकठिकाणी गुप्त गुहा, विवरे त्यांनी शोधून ठेवल्याचे म्हटले जाते. कावनई किल्ल्यावरील गुहेतही ते कुंभमेळ्यासाठी आलेल्या महंतांना भेटत, असे उल्लेख जुन्या पत्रात आहेत.




रामदास स्वामींनी आपला पहिला शिष्य उद्धव याच्यासाठी बनविलेली गोमय मारुतीची मूर्ती हे टाकळी मठाचे वैशिष्ट्य आहे. १६३३च्या मार्च महिन्यातील हनुमान जयंतीच्या दिवशी समर्थांनी स्वतःच्या हातांनी गोमयी मिश्रणाची श्रीमारुतीरायाची मूर्ती स्थापन केली. समर्थांनी स्थापन केलेला हा पहिला मारुती होय. या मारुतीचे दर्शन घेण्यासाठी देशभरातून भाविक येथे येतात. ही मूर्ती अजूनही पाहायला मिळते. मठातील गाभाऱ्यात काळ्या पाषाणातील श्रीराम, लक्ष्मण, सीता, हनुमान आदींच्या मूर्ती आहेत. तर इतर काही लाकडातील मूर्ती आहेत. येथे समर्थांची हाताची कुबडी पाहायला मिळते. कमरेस लंगोटी, पायांत खडावा, लांब दाढी, जटा, गळ्यांत जपायची माळ, यज्ञोपवीत, हातांत कुबडी, काखेत झोळी अशा थाटांत समर्थांची रूबाबदार आणि दुसऱ्यावर छाप पाडणारी मूर्ती प्रत्येकाच्या मनात वसलेली आहे. अशीच एक मूर्ती टाकळीतील मठात आहे. तिचे रूप पाहिल्यावर समर्थच समोर उभे आहेत, असा भास होतो. आपल्या साधनेसाठी समर्थांनी टाकळीची निवड करण्यामागे येथील नंदिनी नदीच्या काठावरील टेकडीवरील घळ किंवा गुहा आहे.

आजही समर्थांच्या साधनेचे हे ठिकाण पाहायला मिळते. या गुहेतील शांतता समर्थांच्या साहित्यनिर्मितीला किती पोषक ठरली असेल, याचा अंदाज येतो. समर्थांच्या वास्तव्यासाठी सज्जनगडावरील रामघळ, मोरघळ, तोंडोशीघळ, महाडची शिवथरघळ प्रसिद्ध आहेत. टाकळीतील मठालगतची नंदिनीची अवस्था आता गटारगंगेसारखी असली तरी तिचे विस्तृत पात्र तेव्हा विलोभनीयच असेल, यात शंका नाही. टाकळीतील उपासनेच्या काळात समर्थांची कीर्ति महाराष्ट्रभर पसरली. १६३०साली शहाजीराजे भोसले यांनी टाकळी येथे येऊन रामदास स्वामींची भेट घेतल्याचा उल्लेख पत्रव्यवहारांमध्ये मिळतो. तर छत्रपती शिवाजी महाराजांबरोबरचा पत्रव्यवहार व संभाजींना पाठवलेली पत्र आजही आपल्याला वाचायला मिळतात. समर्थांच्या जीवनावर व टाकळीतील मठावर सुधीर शिरवाडकर यांनी लिहिलेले पुस्तकही भाविकांना मार्गदर्शक ठरते.

मोरगाव येथील गणपतीला पाहूनच रामदास स्वामींना 'सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची' ही आरती स्फुरली. ही गणपतीची आरती लिहून जगभरातील गणेशभक्तांच्या मनात समर्थांनी स्थान निर्माण केले. त्याचप्रमाणे त्यांनी लिहिलेले 'भीमरूपी महारूद्रा वज्र हनुमान मारुती' हे मारुतीचे स्तोत्र सर्व हनुमान भक्त भक्तीभावाने म्हणतात. या विचारांची पेरणी टाकळीत झाल्याचे म्हटले जाते. भारतभ्रमण करून आल्यानंतर त्यांनी समाजात शक्तीच्या साधनेचा प्रसार व्हावा, यासाठी ठिकठिकाणी मारुतीची स्थापना केली. इ. स. १६४४ ते इ. स. १६४८ दरम्यान समर्थांनी शहापूर, मसूर, चाफळ, उंब्रज, शिराळा, मनपाडले, माजगाव, शिंगणबाडी, बाहे व पारगाव येथे दोन अशा अकरा मारुतींची स्थापना केली.

टाकळीतील मठ चारशे वर्षांपूर्वीचा असल्याचे मठाच्या बांधकामांवरून लक्षात येते. अगदी १९७०पर्यंत मठाची अवस्था अत्यंत दयनीय होती. त्यानंतर समर्थ रामदास मठाच्या ट्रस्टने पुढाकार घेऊन मठाला सध्याचे रूप मिळवून दिले आहे. समर्थ गोदावरी व नंदिनीच्या संगमावर स्नान करीत तेथे संगम स्मारक उभारण्याचा ट्रस्टचा मानस आहे. तर मठाला नव्याने रूप देण्यासाठी धडपड सुरू आहे. मात्र मठाचा परिसर दरम्यानच्या काळात बकाल झाला आहे. धर्मसाधना, ज्ञानसाधना, भक्तीसाधनेचे अन् बलोपासनेचे केंद्र म्हणून ते कसे उभे राहिल, यासाठी प्रयत्न होण्याची गरज आहे.

ramesh.padwal@
timesgroup.com

मटा